पाण्यासाठी हाणामारीत तिघांचा मृत्यू

सामाईक विहिरीवरून वाद

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शेतातील सामाईक विहिरीतून पाणी उचलण्याच्या कारणावरून वाशी तालुक्यातील तेरखेडा बावी या पारधी पेढीवर कुटुंबांत झालेल्या हाणामारीत तिघा जणांचा मृत्यू झाला. ही घटना शनिवारी रात्री नऊच्या सुमारास घडल्याचे पोलिसांनी सांगितले. मृत व्यक्तींची नावे सुनील काळे (२०), अप्पा काळे (६५) व वैजनाथ काळे (२२) अशी आहेत. हाणामारीमध्ये लाठ्या-काठ्या आणि कोयत्याचा समावेश असल्याचे येरमाळा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक महेश क्षीरसागर यांनी सांगितले.

धाराशिव जिल्ह्यात तेरखेडा-बावी येथे काळे कुटुंबीयांकडे दहा एकर शेती आहे. या शेतीसाठी ते सामाईक विहिरीतून पाणी वापरत. यातून दोन गटांमध्ये झालेल्या वादाचे रूपांतर भीषण हाणामारीत झाले. हाणामारीत दगड-गोटे आणि लाठी-काठी यांचा वापर करण्यात आला. घटनेतील वैजाबाई काळे या जखमी महिलेस धाराशिव येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले आहे. पोलिसांनी या प्रकरणात पाचजणांना ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

दागिने बनविणाऱ्या 'टोरेस'च्या कार्यालयांबाहेर गर्दीमुळे तणाव

विदेशी कंपनीकडून गुंतवणूकदारांची फसवणूक

मुंबई : दागिने विक्रीसह गुंतवणुकीचा व्यवसाय करणाऱ्या विदेशी कंपनीकडून गुंतवणूकदारांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. गेल्या आठवड्यात व्याजासह परतावा मिळणे अपेक्षित असताना तो न मिळाल्याने कंपनीच्या दादरसह मुंबई-नवी मुंबईतील कार्यालये व दुकानांबाहेर सोमवारी मोठी गर्दी जमल्यामुळे गोंधळाची स्थिती होती. याप्रकरणी पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कंपनीत सुमारे ३ हजार कोटींचा घोटाळा झाला असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

सोने, चांदी, हिरे यांची विक्री करणाऱ्या 'टोरेस' कंपनीने गतवर्षी ३ फेब्रुवारी रोजी मुंबईत कार्यालय सुरू केले. दागिन्याची विक्री केल्यास गुंतवलेल्या रकमेवर आठवड्याला ४ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून मुंबईत अनेक गुंतवणूकदार जोडण्यात आले. शहरात कंपनीच्या ६ शाखा असून कांदिवलीची शाखा काही दिवसांपूर्वीच सुरू झाली होती. ४ हजार रुपयांपासून गुंतवणूक करण्याची सोय व दर आठवड्याला परतावा मिळत असल्याने नागरिकांनी मोठ्या प्रमाणात कंपनीत पैसे गुंतविले.

सुरुवातीला अनेकांना परतावा देण्यात आला. नंतर कंपनीने व्याजदर वाढवून ६ टक्के केल्यामुळे ग्राहकांनी गुंतवणुकीची रक्कमही वाढवली. त्यानंतर कंपनीने थेट ११ टक्के परताव्याचे आमिष दाखविल्यामुळे दादरमधील शाखेत गुंतवणूकदारांची झुंबड उडाली होती. नववर्षाच्या पूर्वसंध्येला हजारो नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली.

दादरमधील 'टोरेस' कंपनीच्या कार्यालयाबाहेर गुंतवणूकदार मोठ्या संख्येने जमा झाल्यामुळे सोमवारी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला.

मित्रमंडळीत सातत्याने चर्चेचा विषय असलेल्या या कंपनीबाबत अधिक माहिती जाणून घेतली. तसेच, त्यांना होणारा नफा बघून लालसेपोटी योग्य - अयोग्य समजेनासे झाले. त्यामुळे अधिक परतावा मिळण्याच्या आशेने घर विकून १७ लाख रुपये कंपनीत गुंतविले. बुधवारपर्यंत पैसे मिळतील, असे काही दिवसांपूर्वी सांगण्यात आले आहे. त्यामुळे आणखी दोन दिवस प्रतीक्षा करणार आहे.

- ज्ञानेश्वर बोडके, गुंतवणूकदार

संमेलनातील सहभागासाठी परदेशातील साहित्यप्रेमी उत्सुक

पुणे : दिल्ली येथे होत असलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास येण्याची इच्छा परदेशातील साहित्यप्रेमींनी व्यक्त केली आहे. संमेलनास येऊ इच्छिणारे विशेषतः पाकिस्तान, इंग्लड आणि अमेरिकेतील मराठी नागरिक आहेत.

सरहद, पुणे आयोजित ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २१ ते २३ फेब्रुवारी या कालावधीत दिल्ली येथील छत्रपती शिवाजी साहित्यनगरी (तालकटोरा स्टेडियम) येथे होत आहे. महाराष्ट्रातील साहित्यप्रेमींप्रमाणे परदेशातूनही रसिक येण्यास उत्सुक आहेत. संमेलनात कसे सहभागी होता येईल, अशी विचारणा त्यांच्याकडून होत आहे. संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार असल्याने पाकिस्तानातील कराची येथील महाराष्ट्र मंडळाचे प्रतिनिधी विशाल राजपूत, तसेच लंडन येथील सुजाता गोठस्कर आणि उत्तम शिराळकर यांनी साहित्य संमेलनास उपस्थित राहण्यासाठी विचारणा केली आहे, अशी माहिती साहित्य संमेलनाचे आंतरराष्ट्रीय समन्वयक डॉ. सतीश देसाई यांनी दिली. दिल्लीतील साहित्य संमेलनासाठी इच्छुक असलेल्या विशेषतः पाकिस्तानातील कराची येथील मराठी भाषिक साहित्यप्रेमींसंदर्भात परराष्ट्र मंत्रालयाच्या, तसेच गृह मंत्रालयाच्या माध्यमातून योग्य ती शहानिशा करून निर्णय घ्यावा, अशी सूचना ज्येष्ठ नेते आणि संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार यांनी केली आहे. परदेशातून साहित्यप्रेमींनी संमेलनास येण्याची इच्छा व्यक्त केली असली, तरी त्याबाबतचा निर्णय अखिल भारतीय साहित्य महामंडळ आणि संयोजन समिती एकमताने घेईल, असे डॉ. देसाई यांनी सांगितले.

पंचमदा यांचे संगीत भावविभोर करणारे

सुरेश वाडकर यांचे मत

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : 'प्रचंड वैविध्य, नादाचे अनोखेपण आणि उत्तम दर्जा ही पंचमदा ऊर्फ आर. डी. बर्मन यांच्या संगीताची वैशिष्ट्ये आहेत. त्यांचे संगीत भावविभोर करणारे आहे', असे मत प्रसिद्ध पार्श्वगायक सुरेश वाडकर यांनी व्यक्त केले.

सुप्रसिद्ध संगीतकार आर. डी. बर्मन (पंचमदा) यांचे चाहते असलेल्या पुण्यातील कलावंतांच्या एका समूहातर्फे दर वर्षी बर्मन यांच्याशी संबंधित कलाकाराचा 'पंचमरत्न' पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. आर. डी. बर्मन यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधत आयोजित यंदाचा 'री-डिस्कव्हरिंग पंचम' हा पुरस्कार सुरेश वाडकर यांना प्रदान करण्यात आला. त्या प्रसंगी वाडकर बोलत होते. रुपाली घोगरे, माधुरी जोशी, मीनल खांडेकर, गौरव प्रभुणे, मंगला घोगरे, सूरज दोशी, किरण दोशी, वसंत एकबोटे या वेळी उपस्थित होते.

वाडकर म्हणाले, 'पंचमदा हे अवलिया संगीतकार होते. वैविध्य हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्यांच्याबरोबर काम करण्याचा अनुभव मला समृद्ध करणारा ठरला. त्यांच्या नावाचा पुरस्कार मिळणे, हे माझे भाग्य आहे.'

सावनी रवींद्र, जितेंद्र भुरूक, रुपाली आनंद, विवेक पांडे, विजय जोशी यांनी पंचमदांनी स्वरबद्ध केलेली गीते सादर केली. अभिनेता संकर्षण कऱ्हाडे आणि योगिनी पोफळे यांनी निवेदनातून पंचमदांचे किस्से सांगितले.

'सीयूईटी-पीजी' परीक्षा १३ ते ३१ मार्चदरम्यान

पुणे : राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाने (एनटीए) विविध विद्यापीठांतील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या समान विद्यापीठ प्रवेश परीक्षेचे (सीयूईटी-पीजी) वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार १३ ते ३१ मार्च या कालावधीत परीक्षा होणार असून, त्यासाठी विद्यार्थ्यांना १ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करता येणार आहे.

एनटीएने परीक्षेची अधिसूचना प्रसिद्ध केली. एकूण १५७ विषयांसाठी ही परीक्षा घेतली जाणार आहे. देशभरातील ३१२ शहरांमध्ये, तर परदेशातील २७ शहरांमध्ये परीक्षा आयोजित केली जाणार आहे. परीक्षेला नकारात्मक गुणांकन पद्धती लागू आहे. परीक्षेसाठी अर्ज प्रक्रिया १ फेब्रुवारीला संपल्यानंतर ३ ते ४ फेब्रुवारी या कालावधीत विद्यार्थ्यांना अर्जात सुधारणा करता येणार आहे. या मुदतीनंतर विद्यार्थ्यांना अर्जात सुधारणा करता येणार नाही. अधिक माहिती https:// exams. nta. ac. in/ CUET- PG/ AFd¯F https:// nta. ac. in/ या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

सहायक प्राध्यापक होणे नेट-सेटशिवायही शक्य?

*(पान १ वरून)*आयोगाने (यूजीसी) प्राध्यापक, प्राचार्य आणि अन्य पदे, तसेच कुलगुरूपदाची पात्रता, निवड प्रक्रियेच्या नव्या नियमावलीचा मसुदा सोमवारी केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी नवी दिल्लीत जाहीर केला. त्यामध्ये या तरतुदी प्रस्तावित आहेत. या मसुद्यावर हरकती-सूचना नोंदवण्यासाठी ५ फेब्रुवारीपर्यंत मुदत देण्यात आली आहे. विद्यापीठ आणि महाविद्यालयातील शिक्षक आणि शैक्षणिक कर्मचाऱ्यांच्या निवडीसाठीची पात्रता, पदोन्नती यासाठी २०१८मध्ये नियमावली करण्यात आली होती. आता २०१८ची नियमावली अधिक्रमित होऊन त्याची जागा २०२५ची नवी नियमावली घेणार आहे.

नव्या मसुद्यातील प्रस्तावित तरतुदींनुसार, प्राध्यापक नियुक्तीसाठीच्या नियमांमध्ये सुधारणा होणार आहे. त्यानुसार, किमान ५५ टक्के गुणांसह पदव्युत्तर पदवी मिळवलेल्यांना यूजीसीची नेट ही परीक्षा उत्तीर्ण न होताही सहायक प्राध्यापकपदी नियुक्ती मिळू शकते. उमेदवारांना त्यांच्या सर्वोत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीच्या आधारे अध्यापनाची परवानगी दिली जाईल. उदाहरणार्थ, गणितामध्ये पदवी, भौतिकशास्त्रात पदव्युत्तर पदवी आणि रसायनशास्त्रात पीएच.डी. मिळवलेला उमेदवार रसायनशास्त्र विषय शिकवण्यासाठी पात्र असेल, तर यूजीसी नेट उत्तीर्ण उमेदवार त्यांची पूर्वीची पदवी किंवा पदव्युत्तर पदवी वेगळ्या विषयात असली, तरी ते नेट परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विषयाचे अध्यापन करू शकतील. विद्यापीठ, महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक पदाच्या पदोन्नतीसाठी पीएच.डी. बंधनकारक असेल. प्राध्यापकांच्या पदोन्नतीमध्ये वापरली जाणारी ॲकॅडमिक परफॉर्मन्स इंडिकेटर (एपीआय) प्रणाली रद्द करण्यात आली आहे.

यूजीसीच्या सध्या अस्तित्वात असलेल्या नियमावलीनुसार, कुलगुरूपदासाठीच्या उमेदवारांना प्राध्यापक म्हणून काम केल्याचा किमान दहा वर्षांचा अनुभव, संशोधन किंवा प्रशासकीय भूमिकेतील अनुभव असणे बंधनकारक होते. मात्र, आता नव्या प्रस्तावित तरतुदींनुसार, उद्योग, सार्वजनिक प्रशासन, सार्वजनिक धोरण किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये किमान दहा वर्षांचा वरिष्ठ स्तरावरील अनुभव आणि महत्त्वपूर्ण शैक्षणिक किंवा विद्वत्तापूर्ण योगदान दिलेल्या व्यक्तीही कुलगुरू पदासाठी पात्र ठरू शकणार आहेत.

कुलगुरूंच्या निवड प्रक्रियेतील शोध समितीमध्ये कुलपती नामनिर्देशित सदस्य, यूजीसी नामनिर्देशित सदस्य, विद्यापीठाच्या अधिसभा, व्यवस्थापन परिषद, कार्यकारी परिषद, व्यवस्थापन मंडळ किंवा समकक्ष मंडळाचा नामनिर्देशित सदस्य यांचा समावेश असेल. समितीने पात्र उमेदवारांतून शिफारस केलेल्या तीन ते पाच उमेदवारांतून एका उमेदवाराची निवड कुलपतींकडून करण्यात येईल. कुलगुरूंची मुदत कमाल पाच वर्षे किंवा वयाची ७० वर्षे पूर्ण, यातील जे आधी होईल तितकी असेल. कुलगुरू निवड प्रक्रिया राबवून कुलगुरूंना जास्तीत जास्त एकदा पुनर्नियुक्ती देता येऊ शकते, असे नमूद करण्यात आले आहे.

कंत्राटी नियुक्ती सहा महिन्यांसाठीच

'महाविद्यालय वा विद्यापीठांतील शिक्षकांच्या मंजूर जागांपैकी रिक्त जागांवर कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करता येईल. मात्र, ही नियुक्ती कमाल सहा महिन्यांसाठी आणि गरज असेल, तेव्हाच करता येईल. पात्रता आणि निवड प्रक्रिया नियमित शिक्षक निवड प्रक्रियेप्रमाणेच असेल. कंत्राटी शिक्षकांचे मासिक वेतन हे नियमित शिक्षकांच्या एकूण वेतनापेक्षा कमी असता कामा नये. कंत्राटी शिक्षकांची नियुक्ती एका शैक्षणिक सत्रापेक्षा जास्त असू नये आणि पुनरावलोकन केल्यानंतर आणखी एका सत्रासाठी पुनर्नियुक्ती करता येईल,' असे मसुद्यात नमूद करण्यात आले आहे.

नवीन पॅन २.० प्रणालीमुळे जुने कार्ड रद्द होणार नाही

ज्येष्ठ सनदी लेखपाल डॉ. सातभाई यांचे मत

पुणे : 'केंद्र सरकारने नव्याने 'क्यूआर कोड' आधारित नवीन पॅनकार्ड (पॅन २.०) प्रणाली लागू केली असली, तरी सद्यःस्थितीत असणारे पॅन कार्ड रद्द होणार नाही,' असे मत सनदी लेखापाल डॉ. दिलीप सातभाई यांनी रविवारी व्यक्त केले. तसेच, सरकारने केवळ सुरक्षितता आणि गुणवत्ता वाढवली असून, नागरिकांनी नवीन ई पॅनकार्डसाठी आवर्जून अर्ज करावे, असे आवाहन त्यांनी या वेळी केले. 'भविष्यात पॅन कार्ड हाच एकमेव ओळखीचा पुरावा म्हणून ओळखला जाणार असल्याने त्याचे महत्त्व आणखी अधोरेखित होईल. त्यामुळे ज्यांनी अद्याप आधार क्रमांक पॅनला जोडलेला नाही, त्यांनी तातडीने दंड भरून ही प्रक्रिया पूर्ण करावी. आतापर्यंत पॅन आणि आधार जोडणी न केलेली देशात ११.५ कोटी पॅन कार्ड निष्क्रिय करण्यात आली आहेत,' असेही सातभाई यांनी स्पष्ट केले.

सजग नागरिक मंचातर्फे 'पॅन २.० : तुमचे जुने पॅनकार्ड चालणार की नवीन काढावे लागणार?' या विषयावर आयोजित मासिक चर्चासत्रात सातभाई बोलत होते. मंचचे अध्यक्ष विवेक वेलणकर, जुगल राठी या वेळी उपस्थित होते.

सर्व करदात्यांना ई-पॅन सध्या मोफत पुरविले जाणार आहेत. विद्यमान पॅन कार्डही आधारसोबत संलग्न असल्यास वैधच राहणार आहे. विद्यमान पॅनधारकांना त्यांचा ई-मेल, मोबाइल, पत्ता, नाव, जन्मदिनांकात सुधारणा करायची असल्यास, 'पॅन २.०' प्रकल्पांतर्गत विनामूल्य करता येईल. महाराष्ट्रातील करदात्यांना नवीन पॅनसाठी अर्ज करताना वडिलांच्या नावासोबत आईचे नाव आवश्यक आहे. विवाहित स्त्रियांनी पॅनसाठी अर्ज करताना पतीच्या नावाचा आग्रह नको. सर्वांनी पॅन क्रमांक दुसऱ्याला देताना पॅन कार्ड देऊ नये, त्याचा दुरुपयोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही,' असे सातभाई यांनी सांगितले.

दारू पिण्यास पैसे न दिल्याने एकाचा खून

पुणे : दारू पिण्यास पैसे न दिल्याने एकाच्या डोक्यात सिमेंटचा गट्टू घालून खून करण्यात आल्याची घटना लोणी काळभोर परिसरात घडली. याप्रकरणी पोलिसांनी एकाला अटक केली.

योगेश लक्ष्मण काळभोर (वय ४५, रा. लोणी काळभोर, पुणे-सोलापूर रस्ता) असे खून झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी नंदू उर्फ पोपट लक्ष्मण म्हात्रे (वय ३९, रा. लोणी काळभोर, पुणे-सोलापूर रस्ता) याला अटक करण्यात आली. याबाबत पोलीस शिपाई केतन उत्तम धेंडे यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या महिन्यात १५ डिसेंबर रोजी योगेश आणि सोमनाथ जाधव हे लोणी काळभोरमधील रायवाडी भागात असलेल्या दत्तात्रय कांबळे यांच्या खोलीत दारू पित होते. त्यावेळी आरोपी नंदू तेथे आला. त्याने योगेशला शिवीगाळ केली. दारू पिण्यास पैसे का दिले नाही, अशी विचारणा करून त्याला धक्काबुक्की केली. झटापटीत त्याने योगेश यांच्या डोक्यात सिमेंटचा गट्टू मारला.

TATA

टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : 11वा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई - 400013.
शाखा कार्यालय : एबीआयएल, पहिला मजला अवंती रेसिडेन्सी, अभिनव चौक, टिळक रोड, पुणे - 411030.

अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी सूचना

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 9(1) सह वाचलेल्या नियम 8(6) अंतर्गत)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 8(6) आणि नियम 9(1) सह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी 30 दिवसांची ई-लिलाव सूचना.

याद्वारे सर्वसामान्य जनतेस आणि कर्जदार / सह-कर्जदारांना किंवा त्यांच्या कायदेशीर वारस / प्रतिनिधींना (कर्जदार) सूचित करण्यात येते की **टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (टीसीएचएफएल)** यांचेकडे तारण असलेल्या खाली नमूद अचल मालमत्तेचा **टीसीएचएफएल** च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी **ताबा घेतलेला असून** त्यांची खाली नमूद कर्जदार व सह - कर्जदारांकडून वसूल करणे असलेल्या एकूण रकमेसाठी **''जशी आहे जेथे आहे'' व ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''जे काही आहे तेथेच आहे''** आणि कोणत्याही आधाराशिवाय'' तत्त्वावर **दि. 10-02-2025** रोजी विक्री करण्यात येईल. आरक्षित किंमत आणि बयाणा रक्कम खाली देण्यात आलेली आहे. याद्वारे सूचित करण्यात येते की विक्री पुढे ढकलण्यात / खंडित करण्यात न आल्यास सदर अनामत मत्ता / मालमत्तेची **दि. 10-02-2025** रोजी **दु. 2.00 वाजता** ई-लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल. या ई - लिलावात सहभागी होण्यासाठी असलेला डिमांड ड्राफ्ट असलेला मोहरबंद लिफाफा **टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड,** एबीआयएल, पहिला मजला अवंती रेसिडेन्सी, अभिनव चौक, टिळक रोड, पुणे - 411030 येथील शाखा कार्यालयात **दि. 08-02-2025** रोजी सायं. 5.00 वाजेपर्यंत किंवा त्या पूर्वी सादर करावा.

अनामत मत्ता / अचल मालमत्तेची विक्री खाली वर्णन केलेल्या संक्षिप्त तपशिलानुसार "जशी आहे जेथे आहे" अटीवर करण्यात येईल :

अ. क्र.	कर्ज खाते क्रमांक	कर्जदार / सह-कर्जदार / कायदेशीर वारस / कायदेशीर प्रतिनिधी / जामीनदार यांचे नाव	मागणी सूचनेनुसार रक्कम	आरक्षित किंमत	बयाणा रक्कम	ताबा प्रकार	नुसार थकबाकी रक्कम
1	9968802 आणि 10036547	श्री. अभिजीत सतीश कांबळे सौ. मीना सतीश कांबळे	करार क्र. 9968802 अंतर्गत तुमच्याद्वारे देय रक्कम **रु. 10,43,376/-** (रुपये दहा लाख त्रेचाळीस हजार तीनशे शहात्तर फक्त) आणि **करार क्र. 10036547** अंतर्गत तुमच्याद्वारे देय रक्कम **रु. 19,174/-** (रुपये एकोणीस हजार एकशे चौरयाहत्तर फक्त) एकूण रक्कम **रु. 10,62,550/-** (रुपये दहा लाख बासष्ट हजार पाचशे पन्नास फक्त) 15-02-2024	रु. 11,52,500/- (रुपये अकरा लाख बावन्न हजार पाचशे फक्त)	रु. 1,15,250/- (रुपये एक लाख पंधरा हजार दोनशे पन्नास फक्त)	प्रत्यक्ष	**करार क्र. 9968802** अंतर्गत तुमच्याद्वारे देय रक्कम **रु. 11,92,133/-** (रुपये अकरा लाख ब्याण्णव हजार एकशे तेहतीस फक्त) आणि **करार क्र. 10036547** अंतर्गत तुमच्याद्वारे देय रक्कम **रु. 19,560/-** (रुपये एकोणीस हजार पाचशे साठ फक्त) एकूण रक्कम **रु. 12,11,693/-** (रुपये बारा लाख अकरा हजार सहाशे त्र्याण्णव फक्त) **दि. 28-12-2024** रोजी नुसार
अचल मालमत्तेचे वर्णन : पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, फ्लॅट क्र. 13, इमारत क्रमांक ए-3 मध्ये, मोजमाप 355 चौ. फूट म्हणजे 32.98 चौ. मीटर कार्पेट क्षेत्रफळ, इमारत क्रमांक / विंग ''ए'' च्या चौथ्या मजल्यावर, संबंधित गट क्र. 289, 06 हे. 16 आर्स पैकी, 05 हे. 74 आर्स पैकी असलेले मोजमाप 01 हे. 54.80 आर्स म्हणजे 15480 चौ. मीटर यावर असलेले बांधकाम, मौजे चिखलसे, ता. मावळ, जि. पुणे येथे स्थित आणि जिल्हा परिषद पुणे यांच्या हद्दीत, उपनिबंधक मावळ यांच्या हद्दीत स्थित.						
2	TCHHF080300100070278 आणि TCHHF0639000100085239	श्री. राजेश ललवाणी श्री. राहुल ललवाणी मे. ललवाणी रोडवेज	करार क्र. TCHHF0639000100085239 अंतर्गत तुमच्याद्वारे देय रक्कम **रु. 43,66,235/-** (रुपये त्रेचाळीस लाख सहासष्ट हजार दोनशे पस्तीस फक्त) आणि **करार क्र. TCHHF0803000100070278** अंतर्गत तुमच्याद्वारे देय रक्कम **रु. 2,34,240/-** (रुपये दोन लाख चौतीस हजार दोनशे चाळीस फक्त) एकूण रक्कम **रु. 46,00,475/-** (रुपये शेहेचाळीस लाख चारशे पंच्याहत्तर फक्त) 12-07-2024	रु. 76,41,000/- (रुपये शहात्तर लाख एक्केचाळीस हजार फक्त)	रु. 7,64,100/- (रुपये सात लाख चौसष्ट हजार शंभर फक्त)	सांकेतिक	करार क्र. **TCHHF 0639000100085239** अंतर्गत तुमच्याद्वारे देय रक्कम **रु. 47,01,812/-** (रुपये सत्तेचाळीस लाख एक हजार आठशे बारा फक्त) आणि करार क्र. **TCHHF 0803000100070278** अंतर्गत तुमच्याद्वारे देय रक्कम **रु. 2,65,948/-** (रुपये दोन लाख पासष्ट हजार नऊशे अट्ठेचाळीस फक्त) एकूण रक्कम **रु. 49,67,760/-** (रुपये एकोणपन्नास लाख सदुसष्ट हजार सातशे साठ फक्त) **दि. 30-12-2024** रोजी नुसार

अचल मालमत्तेचे वर्णन : पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, नोंदणी उपजिल्हा हवेली जिल्हा पुणे अंतर्गत आणि पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत असलेली जमीन, मार्केट यार्ड गुलटेकडी संबंधित प्लॉट क्र. 457 आणि 458, दुकान क्र. 2, तळमजल्यावर, मोजमाप सुमारे 283.5 चौ. फूट. म्हणजे 26.34 चौ. मीटर, पार्किंगची जागा क्रमांक 2 आणि सोबत सामायिक डब्ल्यूसी वापरण्याचा अधिकार, **चतुःसीमा पुढील प्रमाणे - पूर्व किंवा त्या दिशेने :** दुकान क्रमांक 1, **दक्षिण किंवा त्या दिशेने :** प्लॉट क्र. 456, **पश्चिम किंवा त्या दिशेने :** दुकान क्रमांक 3, **उत्तर किंवा त्या दिशेने :** रस्ता. ही मालमत्ता मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे, कृषी उत्पन्न बाजार समिती येथे स्थित आहे.

टीप : कर्जदाराने टीसीएचएफएल विरुद्ध दाखल केलेली रिट याचिका (WPST/22698/2024) मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहे, या प्रकरणात टीसीएचएफएल विरुद्ध कोणताही स्थगिती आदेश पारित केलेला नाही.

बोलीदारांना सल्ला देण्यात येत आहे कि, त्यांनी बोली सादर करण्यापूर्वी योग्य ती काळजी घेण्यात यावी. लिलाव हा खटल्याच्या निकालाच्या अधीन असेल.

लिलावाच्या वेळी सर्व लोकांना सामान्यपणे व्यक्तीशः बोली सादर करण्याचे आवाहन करण्यात येते. या विक्रीच्या संदर्भात कोणतेही कर्तव्य बजावणारया अधिकारयास किंवा अशा इतर कोणत्याही व्यक्तीस प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे विक्री करण्यात येणारया मालमत्तेसाठी बोली देता किंवा काही हित साधता येणार नाही.

सदर विक्री ही सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 मध्ये विहित करण्यात आलेल्या तसेच पुढील अटींच्या अधीन राहून करण्यात येईल :

टीप :- सदर ई-लिलाव हा दिनांक 10-02-2025 रोजी दु. 2.00 ते दु. 3.00 वा. दरम्यान http://bankauctions.in/ पोर्टलच्या माध्यमातून घेण्यात येईल व यात प्रत्येकी 5 मिनिटांचे मर्यादित कालविस्तार असतील.

अटी व शर्ती : 1. खाली परिशिष्टात देण्यात आलेला तपशील निम्नस्वाक्षरीकारांकडे उपलब्ध माहितीच्या आधारे देण्यात आलेला असून या घोषणेत चूक असल्यास, चुकीचे विधान करण्यात आल्यास किंवा काही गाळण्यात आल्यास त्यासाठी निम्नस्वाक्षरीकार जबाबदार असणार नाहीत. बोलीची रक्कम अथवा बोलीदारासंदर्भात काहीही वाद निर्माण झाल्यास ती अचल मालमत्ता सुरक्षित धनकोच्या संमतीने पुन्हा विक्रीस काढण्यात येईल. **2.** सदर मालमत्तेची आरक्षित किमतीपेक्षा कमी रकमेस विक्री करण्यात येणार नाही. **3.** बोली वृद्धी रक्कम **रु. 10,000/-** (रुपये दहा हजार फक्त) असेल. **4.** सदर मालमत्तेच्या खरेदीसाठी प्रस्तुत करण्यात येणारया सर्व बोली डिमांड ड्राफ्टच्या स्वरूपातील **''टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.''** यांचे नावे काढण्यात आलेल्या आणि शाखा कार्यालयाच्या पत्त्यावर देय असलेल्या बयाणा रकमेसह सादर करावयात. अयशस्वी बोलीदारांची बयाणा रक्कम लिलावानंतर परत करण्यात येईल. बयाणा रकमेचा एनईएफटी / आरटीजीएस / आयएमपीएस द्वारे भरणा करण्यासाठी कृपया प्राधिकृत अधिकारयांशी संपर्क साधावा. **5.** सर्वोच्च बोलीदार बोली देण्यास पात्र असल्यास आणि त्याने प्रस्तुत केलेली बोलीची रक्कम आरक्षित किमतीपेक्षा कमी नसल्यास त्यास खरेदीदार घोषित करण्यात येईल. सर्वोच्च बोलीदाराने प्रस्तुत केलेली बोली रक्कम अत्यंत कमी वाटत असल्यास ती बोली फेटाळण्याचा अधिकार **'प्राधिकृत अधिकारयास'** असेल. **6.** नमूद केलेल्या कारणांसाठी विक्री बरखास्त करण्याचा / खंडित करण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारयास असेल. **7.** आधीच वेळ घेऊन **दि. 03-02-2025 रोजी स. 11 ते सायं. 5.00 वाजेपर्यंत** अचल मालमत्तेची पाहणी करता येईल. **8.** यशस्वी बोलीदार घोषित करण्यात आलेल्या व्यक्तीस अशी घोषणा करण्यात आल्यानंतर लगेच बयाणा रक्कम धरून खरेदी किमतीच्या 25 टक्के रक्कम 'प्राधिकृत अधिकारया'कडे 24 तासांच्या जमा करावी लागेल आणि ही रक्कम जमा न केल्यास सदर मालमत्ता पुन्हा लिलावात / खाजगी तहाद्वारे पुन्हा विक्रीस काढण्यात येईल. **9.** वर नमूद केल्याप्रमाणे सुरुवातीची रक्कम जमा करण्यात आल्यास खरेदी रकमेपैकी उर्वरित देय रक्कम खरेदीदारास मालमत्तेच्या विक्रीची निश्चिती होण्याच्या दिनांकापासून **15 दिवसांचे आत** 'प्राधिकृत अधिकारया' कडे जमा करावी लागेल किंवा 15 व्या दिवशी रविवार किंवा सुटीचा दिवस येत असल्यास त्यापुढील दिवशी जमा करावी लागेल. **10.** वर नमूद कालावधीत भरणा न केल्यास विक्रीची पुन्हा घोषणा करण्यात आल्यानंतर सदर मालमत्तेची खाजगी कराराद्वारे लिलाव / विक्री करण्यात येईल. तोवर भरलेली रक्कम **टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** द्वारे जप्त करण्यात येईल अशी कसूर करणारया खरेदीदारास मालमत्तेवर किंवा पुढे त्या मालमत्तेची ज्या रकमेस विक्री करण्यात येईल तिच्या कोणत्याही भागावर कोणताही दावा सांगता येणार नाही. **11. टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** ला ज्ञात असलेले मालमत्तेवरील बोजे : वरील तक्त्यानुसार. इच्छुक बोलीदारांनी मालमत्ता कर, वीज बिल इ. सह वैधानिक देणी इ. सारख्या मालमत्तेवरील बोज्यांच्या संदर्भात स्वतंत्रपणे चौकशी करावी. **12.** इतर कोणताही तपशील किंवा ई-लिलावाच्या ऑनलाइन प्रशिक्षणासाठी संभाव्य बोलीदार आमचे सेवा पुरवठादार मे. 4क्लोजर, ब्लॉक नं. 605 ए, सह्यावा मजला, मैत्रीवनम कमर्शिअल कॉम्प्लेक्स, अमीरपेठ, हैदराबाद, 500038, ईमेल : **info@bankauctions.in किंवा मनीष बन्सल, ई मेल आयडी : Manish.Bansal@tatacapital.com प्राधिकृत अधिकारी, मो. क्र. 8588983696** यांचे मार्फत संपर्क साधू शकतात. कृपया तुमची शंका व्हॉट्स ॲप क्र. 9999078669 वर पाठवा. **13.** सर्वोच्च घोषित करण्यात आलेल्या बोली रकमेवर सर्वोच्च बोलीदारास 1% दराने टीडीएस द्यावा लागेल. हा भरणा सर्वोच्च बोलीदारास मालक / कर्जदाराच्या पॅनमध्ये करावा लागेल आणि चलन ची प्रत आमच्या कंपनीकडे सादर करावी लागेल. **14.** वरील तपशीलासाठी सुरक्षित धनकोच्या वेबसाईटवर दिलेली **http://surl.li/qkjfzb** लिंक पाहावी. **15.** तसेच **https://www.tatacapital.com/property-disposal.html** या लिंकवर देखील ही भेट द्यावी.

कृपया लक्षात घ्यावे - टीसीएचएफएल ने या मालमत्तेच्या विक्री / लिलावासाठी वर नमूद लिलाव भागीदाराशिवाय इतर कोणत्याही ब्रोकर / एजं